CNRNoMHKO190001282026

दावा दाखल ता. ०९.०३.२०२६

दावा फैल ता. १२.०३.२०२६

दावा निकाल ता. ०१.०४.२०२६

## हुकूमनामा

**रे. क. नं. २९/२०२६**

**निशाण नं.** ९०।अ

**राधानगरी येथील मे. दिवाणी न्यायाधिशसो, क. स्तर,**

**यांचे कोर्टात...**

| | |
|---|---|
| १. श्रीमती अनिता सुरेश शिंदे<br>व. व. ६०, धंदाः शेती,<br>रा. आवळी बु ।।, ता. राधानगरी,<br>जि. कोल्हापूर.<br>२. प्रियांका सुरेश शिंदे<br>व. व. ३२, धंदाः शेती,<br>रा. आवळी बु ।।, ता. राधानगरी,<br>जि. कोल्हापूर. | वादी |

विरूध्द

१. श्री. संभाजी बाळू शिंदे

व. व. ७२, धंदाः शेती,

रा. आवळी बु ाा, ता. राधानगरी,

जि. कोल्हापूर.

२. श्रीमती आनंदी रंगराव शिंदे

व. व. ७०, धंदाः घरकाम,

रा. आवळी बु ाा, ता. राधानगरी,

जि. कोल्हापूर.

३. श्री. संजय रंगराव शिंदे

व. व. ५५, धंदाः शेती,

रा. आवळी बु ाा, ता. राधानगरी,

जि. कोल्हापूर.

४. श्री. रमेश रंगराव शिंदे

व. व. ५३, धंदाः शेती,

रा. आवळी बु ाा, ता. राधानगरी,

जि. कोल्हापूर.

५. आनंदी श्रीपती चौगले

व. व. ७५, धंदाः शेती,

रा. सोळांकूर, ता. राधानगरी,जि. कोल्हापूर.

} प्रतिवादी

६. श्री. शंकर उर्फ राजेंद्र बाळू चौगले
व. व. ४१, धंदाः शेती,
रा. राधानगरी, ता. राधानगरी,
जि. कोल्हापूर.
७. श्री. दत्तात्रय बाळू चौगले
व. व. ३९, धंदाः शेती व नोकरी,
रा. राधानगरी, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर.
८. लक्ष्मी पांडूरंग आळवणे
व. व. ७०, धंदाः शेती,
रा. कपिलेश्वर, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर.

प्रतिवादी

दावा सरसनिरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी
कोर्ट फी साठी आकारणी रू. ३३०/–व
ज्युरिसडिक्शनसाठी आकारणी रू. ४,८६२/–

यातील वादीचा दावा असा की,


१. दावा मिळकतीचे वर्णनः

मौजे आवळी बु ।।, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथील खालील वर्णनाच्या शेतजमीनी.

| अ. नं. | गट नंबर | एकूण क्षेत्र<br>हे. आर | आकार रू.<br>पैसे | हिस्सा |
|---|---|---|---|---|
| १. | २१० | ०.२१.०० | २.३१ | संपूर्ण |
| २. | ९०३ | ०.३४.००<br>पो. ख. ०.०४ | ३.२६ | संपूर्ण |
| ३. | २४३/१ | ०.५७.३०<br>पो.ख. ०.०२ | ७.११ | ०.०९.०० |
| ४. | २४३/२ | ०.१८.४० | २.६७ | ०.०३.०६ |
| ५. | १०८९ | ०.१०.२० | १.३० | संपूर्ण |
| ६. | ५२३ | ०.६७.०० | ०.५९ | संपूर्ण |
| ७. | ५५३ | ०.१२.०० | ०.१६ | संपूर्ण |
| ८. | ५६१ | ०.११.०० | १.१७ | संपूर्ण |
| ९. | ५६३ | ०.२३.०० | ०.२८ | संपूर्ण |
| १०. | ४९६ | ०.२१.०० | १.२६ | संपूर्ण |
| ११. | ४९१ | ०.१६.२० | १.९२ | संपूर्ण |
| १२. | ४८८ | ०.१४.२० | ०.३५ | संपूर्ण |
| १३. | ४८६ | ०.०८.१० | ०.७५ | संपूर्ण |
| १४. | ५०४ | ०.१०.१० | १.१८ | संपूर्ण |

येणेप्रमाणे वर्णनाच्या शेतजमीनी हया दावा मिळकती होय. त्यांना येथुनपुढे संक्षिप्तासाठी व सोयीसाठी 'दावा मिळकती' अगर 'सदर मिळकती' असे संबोधण्यात येईल.

२. यातील वादी व प्रतिवादी यांची वंशावळ खालीलप्रमाणेः




येणेप्रमाणे वंशावळ होय.

३. वर नमुद कलम १ मधील दावा मिळकती हया वादी व प्रतिवादी यांच्या वडीलोपार्जित मिळकती होय. दावा मिळकतीचे अदयापी वादी व प्रतिवादी यांचेमध्ये सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. वादी व प्रतिवादी यांचेमध्ये कौटुबिंक सोयीनुसार दावा मिळकती वहिवाटीने कसून त्यामध्ये ऊस, भात इत्यादी पिके घेत आहेत. वादी व प्रतिवादी स्वतंत्रपणे जेवणखाण करून विभक्त राहत आहेत.

४. वादी व प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार कै. बाळू सखाराम शिंदे यांचा भाऊ कै. राऊ सखाराम शिंदे हे दि. २७.१२.२००४ इ. रोजी मयत झालेले आहेत.

तसेच कै. राऊ सखाराम शिंदे यांची पत्नी कै. गौराबाई राऊ शिंदे हया दि. १०.०३.१९९८ इ. रोजी मयत झाल्या आहेत. कै. राऊ सखाराम शिंदे व कै. गौराबाई शिंदे यांना मुलबाळ नाही. त्यामुळे त्यांना वादी व प्रतिवादी हेच सरळ व कायदेशिर वारस आहेत. कै. राऊ सखाराम शिंदे यांच्या शेतजमीनी वादी व प्रतिवादी यांचेकडे त्यांच्यापश्चात कब्जेवहिवाटीस आहेत. सदर मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांचा अविभाज्य हिस्सा आहे.

५. दावा मिळकतीच्या अदयापी वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान सरसनिरस मानाने कोणत्याही प्रकारे वाटप झालेले नाही. वादी यांचा दावा मिळकतीमध्ये एकत्रीत १/६ असा हिस्सा आहे. वादी यांनी प्रतिवादी यांचेकडे आपला हिस्सा तुटक करून मागितला असता प्रतिवादीनी तो देण्यास नकार दिला म्हणून वादी यांनी दावा मिळकतीमधील आपला कायदेशिर हिस्सा वाटप करून तुटक हिस्सा मिळणेसाठी सदरचा दावा मे. कोर्टात दाखल करणे भाग पडले आहे.

६. दाव्यास कारणः

वादीनी दि. ०१.०३.२०२६ इ. रोजी आपला दावा मिळकतीमधील १/६ हिस्सा तुटक करून मागितला त्यावेळी प्रतिवादीनी तो देण्यास नकार दिला व उडवाउडवीची उत्तरे देवून तुम्हाला काय करायचे ते कर, हिस्सा कोठून घ्यायचा तो घे, असे उध्द्ट उत्तर दिले त्यावेळी व आजही वेळोवेळी दाव्यास कारण घडले आहे व घडत आहे.

७. दाव्याचा तपशिलः

३३०.०० दावा सरसनिरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी दावा मिळकतीची ऐच्छिक किंमत सदरी दाखल.

---

३३०.०० एकूण

---

**<u>८. दाव्याची आकारणीः</u>**

दाव्याची आकारणी कोर्ट फी साठी रक्कम रू. ३३०/- इतकी केली असून ज्युरिसडिक्शनसाठी रक्कम रू. ४,८६२/- इतकी केलेली असून त्यावर कोर्ट फी स्टॅम्प ॲक्ट नुसार योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे.

९. वादी, प्रतिवादी व दावा मिळकत या मे. कोर्टाचे स्थलसिमेत असलेने सदरचा दावा चालविण्याचा अधिकार या मे. कोर्टाना आहे.

१०. वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान वाद विषयाव्यतिरिक्त कोणताही दावा कोणत्याही कोर्टात वा इतरत्र प्रलंबित नाही.

११. वादी, प्रतिवादीपैकी कोणीही विकलांग नाही.

१२. वादीचा दावा मुदतीत आहे.

**<u>१३. सबब वादी यांची विनंती की,</u>**

अ) वादीचा दावा खर्चासह मंजूर करणेत यावा.

ब) दावा मिळकतीमधील वादीचा एकत्रीत १/६ हिस्सा अगर कायदेशिर हिस्सा सरसनिरस मानाने वाटप होवून मिळावा व तसा ठराव व हुकूमनामा व्हावा.

क) जरूर तर दावा दुरूस्तीस परवानगी असावी.

ड) न्यायाचे सर्व हुकूम व इतर अनुषंगिक दादी वादी यांच्या वतीने व्हाव्यात.

येणेप्रमाणे दावा असे.

आज दि. ०१.०४.२०२६ इ. रोजी सदरचा दावा श्रीमती एन. पी. काकडेसाो, मे. सह. दिवाणी न्यायाधिश क. स्तर, राधानगरी यांचेसमोर वादी व वादीतर्फे वकील ॲड. बाबासाहेब आ. वागरे आणि प्रतिवादी व प्रतिवादीतर्फे वकील श्री. विनोद विठ्ठल मुसळे यांचेसमक्ष प्रकरण अंतिम निकालासाठी निघालेवरून निशाणी नं. ९/ब प्रमाणे आपसात तडजोड पुरसिस व आदेश खालील प्रमाणे होत आहे.

<u>निशाणी ९/ब प्रमाणे यातील वादी व प्रतिवादी यांची आपसात तडजोड पुरसीस खालीलप्रमाणेः</u>

१. प्रस्तुतचा दावा वादींनी दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. सदर कामी वादी व प्रतिवादी हे नातेसंबंधातील असून दावा अर्जी कलम १ मधील नमुद मिळकत वादी, प्रतिवादी यांच्या एकत्र कुटूंबाची मिळकत असलेचे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे. यातील वादी व प्रतिवादी यांचेमधील नातेसंबंध टिकवणेसाठी त्यांचेमध्ये आपआपसात दावा मिळकतीच्या वाटणीबाबतची बोलणी होवून त्यांचेमध्ये दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने तोंडी वाटप झालेले असून सदर वाटपाचे लेखी स्मरणपत्र राहावे म्हणून वादी, प्रतिवादी हे सदर तडजोड पुरसीस लिहून ठेवत आहेत.

३. वादी व प्रतिवादी यांचेमधील तडजोड झालेली दावा मिळकत पुढीलप्रमाणेः

मौजे आवळी बु ॥, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथील खालील वर्णनाच्या शेत मिळकती.

| अ. नं. | गट नंबर | एकूण क्षेत्र हे. आर | आकार रू. पैसे | हिस्सा |
|---|---|---|---|---|
| १. | २१० | ०.२१.०० | २.३१ | संपूर्ण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | ९०३ | ०.३४.००<br>पो. ख. ०.०४ | ३.२६ | संपूर्ण |
| ३. | २४३/१ | ०.५७.३०<br>पो.ख. ०.०२ | ७.११ | ०.०९.१० |
| ४. | २४३/२ | ०.१८.४० | २.६७ | ०.०३.०६ |
| ५. | १०८९ | ०.१०.२० | १.३० | संपूर्ण |
| ६. | ५२३ | ०.६७.०० | ०.५९ | संपूर्ण |
| ७. | ५५३ | ०.१२.०० | ०.१६ | संपूर्ण |
| ८. | ५६१ | ०.११.०० | १.१७ | संपूर्ण |
| ९. | ५६३ | ०.२३.०० | ०.२८ | संपूर्ण |
| १०. | ४९६ | ०.२१.०० | १.२६ | संपूर्ण |
| ११. | ४९१ | ०.१६.२० | १.९२ | संपूर्ण |
| १२. | ४८८ | ०.१४.०० | ०.३५ | संपूर्ण |
| १३. | ४८६ | ०.०८.१० | ०.७५ | संपूर्ण |
| १४. | ५०४ | ०.१०.१० | १.१८ | संपूर्ण |

येणेप्रमाणे वर्णनाची शेत जमीन या तडजोड पुरसीसचा विषय आहे.

४. वादी व प्रतिवादी यांचेमध्ये ठरलेल्या आपसात तडजोडीप्रमाणे दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची एकत्र कुंटूंबाच्या मिळकत असलेचे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे. दावा मिळकतीचे ७/१२ सदरी प्रतिवादी यांचे जे नाव नोंद आहे ते नाव वादी व प्रतिवादी यांचेकरीता म्हणून नोंद असलेचे व दावा मिळकतीमध्ये वादी यांचा कायदेशिर हिस्सा असलेचे प्रतिवादी व वादी यांना मान्य व कबूल आहे.

५. वादी व प्रतिवादी यांचेमध्ये झालेल्या तडजोडीप्रमाणे दावा मिळकतीच्या सरसनिरस मानाने झालेल्या वाटपाची तडजोड पुरसिस पुढीलप्रमाणेः

(१) यातील **वादी नं. १. श्रीमती अनिता सुरेश शिंदे व वादी नं. २ प्रियांका सुरेश शिंदे** यांना समाईकात वाटणीस दिलेल्या शेतमिळकती खालीलप्रमाणेः

(अ) मौजे आवळी बु ॥, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथील गट नं. ९०३ एकूण क्षेत्र हे. ०.३४.०० आर पो. ख. हे. ०.०४.०० आर आकार रू. ३.२६ पैसे यापैकी दावा मिळकत म्हणून दिलेले क्षेत्र हे. ०.१५.०० आर ही मिळकत.

(ब) मौजे आवळी बु ॥, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथील गट नं. ४९६ एकूण क्षेत्र हे. ०.२१.०० आर आकार रू. १.२६ पैसे ही संपूर्ण हिस्सेचे मिळकत म्हणजेच हे. ०.२१.०० आर ही मिळकत.

(क) मौजे आवळी बु ॥, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथील गट नं. ५५३ एकूण क्षेत्र हे. ०.१२.०० आर आकार रू. ०.१६ पैसे ही संपूर्ण हिस्सेचे मिळकत म्हणजेच हे. ०.१२.०० आर ही मिळकत.

(ड) मौजे आवळी बु ॥, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथील गट नं. ५०४ एकूण क्षेत्र हे. ०.१०.१० आर आकार रू. १.१८ पैसे ही संपूर्ण हिस्सेचे मिळकत म्हणजेच हे. ०.१०.१० आर ही मिळकत.

(इ) मौजे आवळी बु ॥, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथील गट नं. १०८९ एकूण क्षेत्र हे. ०.१०.२० आर आकार रू. १.३० पैसे यापैकी १/२ हिस्सेचे क्षेत्र वादी नं. १ व २ यांचे वाटणीस दिलेले आहे.

(फ) मौजे आवळी बु ॥, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथील गट नं. ५२३ एकूण क्षेत्र हे. ०.६७.०० आर आकार रू. ०.५९ पैसे यापैकी हे. ०.२२.३३ आर क्षेत्राची मिळकत.

वर नमुद शेतमिळकती यातील प्रतिवादी नं. १ ते ८ यांनी वादी नं. १ व २ यांना सरसनिरस मानाने वाटप करून कायमस्वरूपी मालकी

हक्काने कब्जेवहीवाटीस दिलेली आहे. प्रतिवादी नं.१ ते ८ हे वर नमुद मिळकतीमधील आपले कायदेशिर हक्क व अधिकार कायमपणे सोडून देत आहेत. तसेच वर नमुद मिळकती व्यतिरिक्त अन्य दावा मिळकतीमधील वादी नं. १ व २ यांचे असलेले हक्क व अधिकार वादी नं. १ व २ हे सोडून देत आहेत. येथुनपुढे वर नमुद मिळकती व्यतिरिक्त अन्य दावा मिळकतीमधील वादी नं. १ व २ यांचा कोणताही हिस्सा व अधिकार राहिलेला नाही हे वादी नं. १ व २ यांना मान्य व कबूल आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी नं. १ ते ८ यांचा वादी नं. १ व २ यांचे हिस्सेस देणेत आलेल्या वर नमुद मिळकतीमध्ये येथुनपुढे कोणताही हक्क व अधिकार राहिलेला नाही हे प्रतिवादी नं. १ ते ८ यांना मान्य व कबूल आहे. तसेच प्रतिवादी नं. १ ते ८ हे वादी नं. १ व २ यांचे हिस्सेस देणेत आलेल्या वर नमुद मिळकतीबाबत भविष्यात कोणताही कायदेशिर वाद उत्पन्न करणार नाहीत.

(२) यातील **प्रतिवादी नं. १. संभाजी बाळू शिंदे** यांना वाटणीस दिलेली शेतमिळकती खालीलप्रमाणेः

(अ) मौजे आवळी बु ।।, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथील गट नं. ९०३ एकूण क्षेत्र हे. ०.३४.०० आर पो. ख. हे. ०.०४.०० आर आकार रू. ३.२६ पैसे यापैकी हे. ०.१५.०० आर व पो. ख. हे. ०.०४.०० आर क्षेत्राची मिळकत.

(ब) मौजे आवळी बु ।।, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथील गट नं. ५६३ एकूण क्षेत्र हे. ०.२३.०० आर आकार रू. ०.२८ पैसे ही संपूर्ण क्षेत्राची मिळकत म्हणजेच हे. ०.२३.०० आर क्षेत्राची मिळकत.

(क) मौजे आवळी बु ।।, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथील गट नं. ५६१ एकूण क्षेत्र हे. ०.११.०० आर आकार रू. १.१७ पैसे ही संपूर्ण क्षेत्राची मिळकत म्हणजेच हे. ०. ११.०० आर क्षेत्राची मिळकत.

(ड) मौजे आवळी बु ।।, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथील गट नं. ५२३ एकूण क्षेत्र हे. ०.६७.०० आर आकार रू. ०.५९ पैसे यापैकी क्षेत्र हे. ०.२२.३३ आर क्षेत्राची मिळकत.

(इ) मौजे आवळी बु ।।, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथील गट नं. १०८९ एकूण क्षेत्र हे. ०.१०.२० आर आकार रू. १.३० पैसे यापैकी १/२ हिस्सेचे क्षेत्र प्रतिवादी नं. १ यांचे वाटणीस दिलेले आहे.

वर नमुद शेतमिळकत यातील वादी नं. १ व २ व प्रतिवादी नं. २ ते ८ यांनी प्रतिवादी नं. १ यांना सरसनिरस मानाने वाटप करून कायमस्वरूपी मालकी हक्काने कब्जेवहीवाटीस दिलेली आहे. वादी नं. १ व २ व प्रतिवादी नं. २ ते ८ हे वर नमुद मिळकतीमधील आपले कायदेशिर हक्क व अधिकार कायमपणे सोडून देत आहेत. तसेच वर नमुद मिळकती व्यतिरिक्त अन्य दावा मिळकतीमधील प्रतिवादी नं. १ यांचे असलेले हक्क व अधिकार प्रतिवादी नं. १ हे सोडून देत आहेत. येथुनपुढे वर नमुद मिळकती व्यतिरिक्त अन्य दावा मिळकतीमधील प्रतिवादी नं. १ यांचा कोणताही हिस्सा व अधिकार राहिलेला नाही हे प्रतिवादी नं. १ यांना मान्य व कबूल आहे. त्याचप्रमाणे वादी नं. १ व २ व प्रतिवादी नं. २ ते ८ यांचा प्रतिवादी नं. १ यांचे हिस्सेस देणेत आलेल्या वर नमुद मिळकतीमध्ये येथुनपुढे कोणताही हक्क व अधिकार राहिलेला नाही हे वादी नं. १ व २ व प्रतिवादी नं. २ ते ८ यांना मान्य व कबूल आहे. तसेच वादी नं. १ व २ व प्रतिवादी नं. २ ते ८ हे प्रतिवादी नं. १ यांचे हिस्सेस देणेत आलेल्या वर नमुद मिळकतीबाबत भविष्यात कोणताही कायदेशिर वाद उत्पन्न करणार नाहीत.

(३) यातील **प्रतिवादी नं. २. श्रीमती आनंदी रंगराव शिंदे, प्रतिवादी नं. ३ श्री. संजय रंगराव शिंदे व प्रतिवादी नं. ४. श्री. रमेश रंगराव शिंदे** यांना समाई कात वाटणीस दिलेली शेतमिळकती खालीलप्रमाणेः

(अ) मौजे आवळी बु ाा, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथील गट नं. २१० एकूण क्षेत्र हे. ०.२१.०० आर आकार रू. २.३१ पैसे ही संपूर्ण क्षेत्राची म्हणजेच हे. ०.२१.०० आर मिळकत समाईकात वाटणीस दिलेली आहे.

(ब) मौजे आवळी बु ाा, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथील गट नं. २४३/१ एकूण क्षेत्र हे. ०.५७.३० आर पो. ख. हे. ०.०२.०० आर आकार रू. ७.११ पैसे यापैकी वादी व प्रतिवादी नं. १ ते ८ यांचे हिस्सेची संपूर्ण मिळकत म्हणजेच हे. ०.०९.१० आर मिळकत समाईकात वाटणीस दिलेली आहे.

(क) मौजे आवळी बु ाा, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथील गट नं. २४३/२ एकूण क्षेत्र हे. ०.१८.४० आर आकार रू. २.६७ पैसे यापैकी वादी व प्रतिवादी नं. १ ते ८ यांचे हिस्सेची संपूर्ण मिळकत म्हणजेच हे. ०.०३.०६ आर मिळकत समाईकात वाटणीस दिलेली आहे.

(ड) मौजे आवळी बु ाा, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथील गट नं. ४८८ एकूण क्षेत्र हे. ०.१४.०० आर आकार रू. ०.३५ पैसे ही संपूर्ण क्षेत्राची मिळकत म्हणजेच हे. ०.१४.०० आर मिळकत समाईकात वाटणीस दिलेली आहे.

(इ) मौजे आवळी बु ाा, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथील गट नं. ४८६ एकूण क्षेत्र हे. ०.०८.१० आर आकार रू. ०.७५ पैसे ही संपूर्ण क्षेत्राची मिळकत म्हणजेच हे. ०.०८.१० आर मिळकत समाईकात वाटणीस दिलेली आहे.

(फ) मौजे आवळी बु ाा, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथील गट नं. ४९१ एकूण क्षेत्र हे. ०.१६.२० आर आकार रू. १.९२ पैसे ही संपूर्ण क्षेत्राची मिळकत म्हणजेच हे. ०.१६.२० आर मिळकत समाईकात वाटणीस दिलेली आहे.

(ग) मौजे आवळी बु ॥, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथील गट नं. ५२३ एकूण क्षेत्र हे. ०.६७.०० आर आकार रू. ०.५९ पैसे यापैकी हे. ०.२२.३४ आर मिळकत समाईकात वाटणीस दिलेली आहे.

वर नमुद शेतमिळकत यातील वादी नं. १ व २ व प्रतिवादी नं. १ व प्रतिवादी नं. ५ ते ८ यांनी प्रतिवादी नं. २ ते ४ यांना सरसनिरस मानाने वाटप करून कायमस्वरूपी मालकी हक्काने कब्जेवहीवाटीस दिलेली आहे. वादी नं. १ व २ व प्रतिवादी नं. १ व प्रतिवादी नं. ५ ते ८ हे वर नमुद मिळकतीमधील आपले कायदेशिर हक्क व अधिकार कायमपणे सोडून देत आहेत. तसेच वर नमुद मिळकती व्यतिरिक्त अन्य दावा मिळकतीमधील प्रतिवादी नं. २ ते ४ यांचे असलेले हक्क व अधिकार प्रतिवादी नं. २ ते ४ हे सोडून देत आहेत. येथुनपुढे वर नमुद मिळकती व्यतिरिक्त अन्य दावा मिळकतीमधील प्रतिवादी नं. २ ते ४ यांचा कोणताही हिस्सा व अधिकार राहिलेला नाही हे प्रतिवादी नं. २ ते ४ यांना मान्य व कबूल आहे. त्याचप्रमाणे वादी नं. १ व २ व प्रतिवादी नं. १ व प्रतिवादी नं. ५ ते ८ यांचा प्रतिवादी नं. २ ते ४ यांचे हिस्सेस देणेत आलेल्या वर नमुद मिळकतीमध्ये येथुनपुढे कोणताही हक्क व अधिकार राहिलेला नाही हे वादी नं. १ व २ व प्रतिवादी नं. १ व प्रतिवादी नं. ५ ते ८ यांना मान्य व कबूल आहे. तसेच वादी नं. १ व २ व प्रतिवादी नं. १ व प्रतिवादी नं. ५ ते ८ हे प्रतिवादी नं. २ ते ४ यांचे हिस्सेस देणेत आलेल्या वर नमुद मिळकतीबाबत भविष्यात कोणताही कायदेशिर वाद उत्पन्न करणार नाहीत. वरीलप्रमाणे सहमतीने वाटणीस आलेले क्षेत्राचे समजूतीचा वाटपतक्ता परिशिष्ठ 'अ' ला या पुरसीससोबत जोडलेले आहे. त्याला या पुरसीसचा भाग समजणेत यावे.

६. यातील **प्रतिवादी नं. ५. आनंदी श्रीपती चौगले** व **प्रतिवादी नं. ८. लक्ष्मी पांडूरंग आळवणे** हया वादी नं. १ यांचे पती व वादी नं. २ यांचे

वडील कै. सुरेश बाळू शिंदे व प्रतिवादी नं. १ यांच्या तसेच प्रतिवादी नं. २ यांचे पती व प्रतिवादी नं. ३ व ४ यांचे वडील कै. रंगराव बाळू शिंदे यांच्या बहिणी असून त्यांचा विवाह चांगले सदन कुटूंबात झालेला आहे. प्रतिवादी नं. ५ व प्रतिवादी नं. ८ हया त्यांच्या सासरी सुखाने राहत आहेत. वादी नं. १, २ व प्रतिवादी नं. १ ते ४ हे प्रतिवादी नं. ५ व ८ यांचे आहेरमाहेर वेळच्यावेळी योग्य प्रकारे करत आहेत. तसेच वादी नं. १, २ व प्रतिवादी नं. १ ते ४ हे यापुढेही प्रतिवादी नं. ५ व ८ यांचे आहेरमाहेर योग्य व चांगले प्रकारे करतील याची पूर्ण खात्री प्रतिवादी नं. ५ व ८ यांना आहे. त्यामुळे त्यांना दावा मिळकतीमधील आपले हिस्सेबाबत कोणताही लोभ व इच्छा राहिलेला नाही. त्यामुळे प्रतिवादी नं. ५ व ८ हया दावा मिळकतीमधील त्यांना प्राप्त होणारा त्यांचा कायदेशिर हिस्सा वादी नं. १ व २ व प्रतिवादी नं. १ ते ४ यांचे लाभात विनामोबदला, विनातक्रार, विनादडपण कायमपणे मालकी हक्काने सोडून देत आहेत. प्रतिवादी नं. ५ व ८ हया भविष्यात दावा मिळकतीमधील आपले हिस्सेबाबत कोणताही वाद करणार नाहीत.

७. यातील **प्रतिवादी नं. ६. श्री. शंकर उर्फ राजेंद्र बाळू चौगले व प्रतिवादी नं. ७. श्री. दत्तात्रय बाळू चौगले** हे वादी नं. १ यांचे पती व वादी नं. २ यांचे वडील कै. सुरेश बाळू शिंदे व प्रतिवादी नं. १ यांच्या तसेच प्रतिवादी नं. २ यांचे पती व प्रतिवादी नं. ३ व ४ यांचे वडील कै. रंगराव बाळू शिंदे यांची बहिण कै. मंगल बाळू चौगले यांची मुले आहेत. प्रतिवादी नं. ६ व ७ यांचे आई कै. मंगल बाळु चौगले लग्नानंतर सासरी सुखाने राहत होती. त्यामुळे प्रतिवादी नं. ६ व ७ यांना दावा मिळकतीमधील आपले हिस्सेबाबत कोणताही लोभ व इच्छा राहिलेला नाही. त्यामुळे प्रतिवादी नं. ६ व ७ हे दावा मिळकतीमधील त्यांना प्राप्त होणारा त्यांचा कायदेशिर

हिस्सा वादी नं. १ व २ व प्रतिवादी नं. १ ते ४ यांचे लाभात विनामोबदला, विनातक्रार, विनादडपण कायमपणे मालकी हक्काने सोडून देत आहेत. प्रतिवादी नं. ६ व ७ हे भविष्यात दावा मिळकतीमधील आपले हिस्सेबाबत कोणताही वाद करणार नाहीत.

७. दावा मिळकतीबाबत ठरलेल्या आपसात तडजोडीप्रमाणे व ठरलेल्या वाटपाप्रमाणे वादी नं. १, २ व प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी दावा मिळकती आपआपले कब्जेत घेतलेल्या आहेत ताब्याबाबत वादी व प्रतिवादी यांची कोणतीही तक्रार नाही.

८. दावा मिळकतीच्या ७/१२ सदरी आजरोजी प्रतिवादी यांचे नाव नोंद आहे वादी, प्रतिवादी यांचेमध्ये झाले वाटपाचे आपसात तडजोड पुरसीस व लवादनामाप्रमाणे वादी नं. १ व २ व प्रतिवादी नं. १ ते ४ यांची नावे ७/१२ सदरी नोंद करणेच्या आहेत. तशी नावे ७/१२ सदरी नोंद करताना वादी, प्रतिवादी यांनी आवश्यक ठिकाणी जाबजबाब देणेचे आहेत व आवश्यक ठिकाणी संमती देणेची आहे.

९. वरीलप्रमाणे वादी, प्रतिवादीमध्ये दावा मिळक्तीबाबत सरसनिरस मानाने वाटप झालेले असून सदर वाटपाबाबत येथुनपुढे वादी, प्रतिवादी व त्यांचे कायदेशिर वारस यांनी कोणतीही तक्रार करणेची नसून सदर तडजोड पुरसीस वादी, प्रतिवादी व त्यांचे कायदेशिर वारस यांचेवर कायमपणे बंधनकारक राहील.

येणेप्रमाणे तडजोड पुरसीस असून त्याप्रमाणे तडजोड हुकूमनामा असे.

## सरसनिरस मानाने रे. क. नं. २९/२०२६ या दाव्यातील जमीन वाटप परिशिष्ट अ

| अ. नं. | गट नं. | सातबारा वरील एकूण क्षेत्र (आर) | पैकी कुंटूंबाचे एकूण क्षेत्र | वादी १) अनिता सुरेश शिंदे २. प्रियांका सुरेश शिंदे यांना सहमतीने वाटून आलेले क्षेत्र हे. (आर) | प्रतिवादी १) संभाजी बाळू शिंदे यांना सहमतीने वाटून आलेले क्षेत्र (हे. आर) | प्रतिवादी २) आनंदी रंगराव शिंदे ३) संजय रंगराव शिंदे ४) रमेश रंगराव शिंदे यांना सहमतीने वाटून आलेले क्षेत्र (हे. आर) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | १०८९ | ०.१०.२० | ०.१०.२० | १/२ हिस्सा | १/२ हिस्सा | निरंक |
| २. | २१० | ०.२१.००<br>पो. ख. ०.०२.०० | ०.२१.०० | निरंक | निरंक | ०.२१.०० |
| ३. | २४३/१ | ०.५७.३०<br>पो.ख. ०.०२.०० | ०.०९.१० | निरंक | निरंक | ०.०९.१० |
| ४. | २४३/२ | ०.१८.४० | ०.०३.०६ | निरंक | निरंक | ०.०३.०६ |
| ५. | ९०३ | ०.३४.००<br>पो. ख. ०.०४.०० | ०.३४.०० | ०.१५.०० | ०.१५.०० | निरंक |
| ६. | ५६३ | ०.२३.०० | ०.२३.०० | निरंक | ०.२३.०० | निरंक |
| ७. | ४८८ | ०.१४.०० | ०.१४.०० | निरंक | निरंक | ०.१४.०० |
| ८. | ४९६ | ०.२१.०० | ०.२१.०० | ०.२१.०० | निरंक | निरंक |
| ९. | ५०४ | ०.१०.१० | ०.१०.१० | ०.१०.१० | निरंक | निरंक |
| १०. | ४८६ | ०.०८.१० | ०.०८.१० | निरंक | निरंक | ०.०८.१० |
| ११. | ४९१ | ०.१६.२० | ०.१६.२० | निरंक | निरंक | ०.१६.२० |
| १२. | ५५३ | ०.१२.०० | ०.१२.०० | ०.१२.०० | निरंक | निरंक |
| १३. | ५६१ | ०.११.०० | ०.११.०० | निरंक | ०.११.०० | निरंक |
| १४. | ५२३ | ०.६७.०० | ०.६७.०० | ०.२२.३३ | ०.२२.३३ | ०.२२.३४ |

## - ORDER –

1. The suit is settled in view of settlement agreement/compromise pursis Exh.9.

2. Decree be drawn up in terms of settlement agreement/compromise pursis Exh.9.

3. Both parties to bear their own costs.

4. Court fees be refunded as per rules.

5. The proceeding is closed.

Date : 01/04/2026

Sd/-

(N. P. Kakade)

Jt. Civil Judge Junior Division,

Radhanagari.

**नियमित दिवाणी दावा क्र. २९/२०२६** **निशाणी नंबर - १०/अ सोबत**

## :खर्चाचा तपशील :

| अ. क्र. | तपशील | वादी | प्रतिवादी १ व २ |
|---|---|---|---|
| १ | दाव्यासोबत मुद्रांक | २००.०० | -- |
| २ | वकीलपत्रास मुद्रांक | १०.०० | १०.०० |
| ३ | दाखल कागदास मुद्रांक | १३५.०० | -- |
| ४ | मुदत अर्जास मुद्रांक | -- | -- |
| ५ | वकील फी | ६०.०० | ६०.०० |
| ६ | प्रोसेस फी | -- | -- |
| ७ | कमिशनरची फी | -- | -- |
| | **एकूण -** | **४०५.००** | **७०.००** |
| | | | |
| १ | मुदत अर्जावरील मुद्रांक | -- | -- |
| २ | कोर्ट फी परतावा | १३३.०० | -- |
| | **एकूण** | **२७२.००** | **७०.००** |

आज दिनांक०६/०४/२०२६ इ. रोजी आमचे सहीने व व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला असे.

क.लि.

Kakade 7/4/26

( एन. पी. काकडे)

**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**राधानगरी.**

वादी तर्फे वकील – ॲड. बी. ए. वागरे
प्र.वादी १ ते ८ तर्फे - ॲड. व्ही. व्ही. मुसळे

(टिप - हया मुकदम्यातील सर्व पक्षकारांना अशी ताकीद देण्यात येते की, त्यांनी हजर केलेले सर्व दस्तऐवज, कागदपत्रे जर ते परत नेले नाहीत तर, अपील झाले असल्यास अपीलाचा निकाल झाल्यावर ते नाश करुन टाकणेस पात्र होतील.)